शैक्षणिक संदर्भ अंक १४७ (एप्रिल - मे २०२४)

महा इतिहास - भाग २७

# विसावे शतक


लेखक : प्रियदर्शिनी कर्वे



# विसावे शतक

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*औद्योगिकीकरण व वसाहतवाद यांनी सारे जग कसे दुभंगून टाकले आहे याची चर्चा गेल्या दोन लेखांत आपण केली. आज आपण एकविसाव्या शतकाची दोन दशके पूर्ण केली आहेत. आजच्या बऱ्याच घडामोडींची बीजे विसाव्या शतकातच रुजली होती. आता विसाव्या शतकाकडे महा इतिहासाच्या दृष्टिकोनातून पाहू या.*



***अफ्रिका-आशिया-युरोप हे त्रिखंड व त्यांपासून काहीसे अलग असलेले अमेरिका व ऑस्टेलिया खंड (स्रोत - विकीपिडिया)***

साधारण सतराव्या शतकापर्यंतचा जगाचा महा इतिहास पाहिला, तर त्यात दोन कल दिसतात. युरोप-आशिया-अफ्रिका या एकमेकांशी जोडलेल्या त्रिखंडामध्ये सामूहिक ज्ञाननिर्मितीतून बहुतेक सारे मानवी समूह भटके जीवन सोडून आधी शेती करू लागले व शेतीतून हळूहळू यांत्रिकीकरणाकडे वाटचाल करू लागले. अमेरिका व ऑस्ट्रेलिया हे या त्रिखंडापासून बराच काळ अलिप्त राहिले. शीतयुगात महासागरांच्या पातळ्या खाली

गेलेल्या असताना मूळच्या आशिया खंडाला या खंडांशी जोडणारे लहान लहान बेटांचे समूह होते आणि त्यामुळे अगदी प्राथमिक स्वरूपाच्या होडक्यांमधूनही आशियातले भटके मानव या दोन खंडांवर पोहचले. पण शीतयुग संपल्यावर त्यांचा त्रिखंडांबरोबरचा संपर्क तुटला. या दोन अलिप्त खंडांपैकी अमेरिकेत काही अंशी भटक्या जीवनशैलीकडून शेतीवर आधारित जीवनशैलीकडे वाटचाल झाली पण तिचा वेग खूपच मंद होता. ऑस्ट्रेलियात तर हे घडलेच नाही.

वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या इंजिनाचा शोध आणि कोळशाच्या मोठ्या खाणींची उपलब्धता ह्या दोन गोष्टी अचानक युरोपात जुळून आल्या आणि त्यामुळे तिथे इतर जगापेक्षा खूपच झपाट्याने यांत्रिकीकरण झाले. खनिज कोळसा या स्वस्त आणि ऊर्जेची घनता खूप जास्त असलेल्या इंधनाने युरोपातील उद्योगधंद्यांना जी प्रचंड गती दिली त्यापुढे आशिया व आफ्रिकेतील माणूस व प्राण्यांची ताकद आणि लाकूडफाटा जाळून मिळणारी उष्णता यांवर आधारित तंत्रज्ञानांचा वेग खूपच कमी पडला. यामुळे औद्योगिक क्रांतीनंतर युरोप-आशिया-अफ्रिका या त्रिखंडातल्या युरोपचीही वाटचाल एका वेगळ्या मार्गाने झालेली दिसते.

शेतीवर आधारित संस्कृतींमध्ये जगाच्या सर्व भागांत शासनकर्त्यांनी बळ व दहशत वापरून प्रजेवर नियंत्रण ठेवले होते. पण युरोपात नव्याने रुजू पहाणाऱ्या औद्योगिक संस्कृतीला फुलण्यासाठी सातत्याने नवीन विचार, नवी तंत्रे व अर्थाजनाचे नवनवे मार्ग हवे होते. यासाठी व्यक्तींना विचारांचे व कृतींचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक होते. पण त्याचवेळी या नव्या अर्थव्यवस्थांना शासनांच्या संरक्षणाचीही गरज होती. एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांतीच्या उधळलेल्या अश्वावर स्वार युरोपीय महासत्ता उर्वरित सर्व जगाकडे

कच्च्या मालाचे पुरवठादार व कारखान्यांच्या उत्पादनांची बाजारपेठ म्हणून पहात होत्या व त्यातून प्रत्येक महासत्ता जगाच्या जास्तीत जास्त भागावर आपले नियंत्रण प्रस्थापित करू पाहात होती. त्या भागांतली संसाधनेच नव्हे तर माणसेही युरोपच्या वेगवान औद्योगिकीकरणातला कच्चा माल बनली होती. याचवेळी प्रत्येक युरोपीय देशांतर्गतही सामाजिक-आर्थिक संघर्ष टिपेला पोहोचत गेले व भांडवलशाहीच्या विरोधात साम्यवादी विचारसरणी उभी राहिली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काही दशकांत महासत्तांमधील बाजारपेठा, कच्चा माल व वसाहतींसाठीची स्पर्धा आणि भांडवलशाही व साम्यवाद यांमधील संघर्ष शिगेला पोहोचले. या धुमश्चक्रीत सारे जग ढवळून निघाले. औद्योगिकीकरण व शहरीकरणाच्या या नव्या पर्वासाठी नवी समाजव्यवस्था निर्माण करण्याची धडपड म्हणजे विसाव्या शतकाचा पूर्वार्ध असे थोडक्यात म्हणता येईल.

कांही देशांमध्ये बाजाराच्या कलानुसार अर्थव्यवस्था वळेल तशी वळू देण्याचे प्रयोग झाले, तर विशेषतः साम्यवादी विचारांच्या प्रभावाखालील देशांमध्ये उद्योगधंद्यांपासून सामाजिक आचार-विचारांपर्यंत सर्वांवर शासकीय नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न झाले. पण या दोन्ही मार्गांची परिणती माणसांच्या दैनंदिन जीवनात सरकारांचा हस्तक्षेप वाढण्यात झाली, हे विशेष. या काळात दळणवळणाची साधने, शिक्षणव्यवस्था, न्यायव्यवस्था इ. अनेक रचनांची शासकीय नियंत्रणाखाली नव्याने रचना केली गेली.

जगात सर्व प्रकारची संसाधने मर्यादित आहेत त्यामुळे जास्तीत जास्त क्षेत्रफळ व पर्यायाने जास्तीत जास्त संसाधने आणि जास्तीत जास्त बाजारपेठाही आपल्या नियंत्रणाखाली असाव्यात, यांसाठी युरोपातील सर्वच देश एकमेकांशी अटीतटीची स्पर्धा

करत होते. यातूनच त्यांनी जगभर आपापली साम्राज्ये उभी केली व त्यांच्या संरक्षणासाठी एकमेकांशी लढाया केल्या. आपापल्या बाजारपेठा एकमेकांच्या प्रभावापासून वेगळ्या ठेवण्याच्या या धडपडीमुळे जागतिक व्यापार अचानक मंदावला. १८७० ते १९१३ या कालावधीत जागतिक व्यापार दरवर्षी ३.४ टक्क्यांनी वाढत गेला होता. १९१३ ते १९५० या कालावधीत दोन महायुद्धेही झाली आणि जागतिक व्यापारातील वाढीचा दर दरवर्षी ०.९ टक्के इतका मंदावला. हाच दर पुढे १९५० नंतर परत ३ टक्क्यांच्या जवळ गेला.

१९१४ साली सुरू झालेले पहिले महायुद्ध हा खरे तर युरोपातील औद्योगिक राष्ट्रांच्या दोन गटांमधला संघर्ष होता. पण या देशांची साम्राज्ये जगभर पसरलेली असल्याने जगातील इतर देशही हा संघर्षात ओढले गेले. हा संघर्ष काही महिन्यांत संपेल, अशी सर्वांची अपेक्षा होती, पण हे युद्ध चार वर्षे चालले. १९१७ नंतर अमेरिका या बलाढ्य औद्योगिक देशाने युद्धात एका बाजूने उडी घेतली म्हणून त्या बाजूचे पारडे जड होऊन दुसऱ्या बाजूला हार मान्य करावी लागली व एकदाचे १९१८ साली युद्ध थांबले.



TREATY SIGNED; WAR OVER

The Evening World. FINAL EDITION

PRICE TWO CENTS. NEW YORK, SATURDAY, JUNE 28, 1919. 14 PAGES PRICE TWO CENTS.

WILSON LEAVES PARIS; SAILS SUNDAY

GERMANS PLEDGED TO ACT IN GOOD FAITH

CITY'S BELLS RING TIDINGS AS PEACE TREATY IS SIGNED; FLEET JOINS IN CELEBRATION

BEST DAY IN HISTORY SINCE BETHLEHEM, SAYS SECRETARY OF THE NAVY

JOY IN WALL STREET.

TREATY SEVERE ON GERMANY, SAYS WILSON, BUT IMPOSES NOTHING SHE CANNOT DO

President in an Address to the American Public Says It Furnishes a Charter for a New Order

GUNS BOOM, PLANES FILL AIR; FRENCH CROWDS CHEER PEACE

GERMANS PLEDGED TO ENFORCE TREATY; NO RESERVATION

WILSON, STARTING FOR HOME, BIDS FRANCE GODSPEED

Mueller Signs for Germans at 3.12, Bell a Minute Later—Wilson's Name Comes Next, Followed by Lloyd George and Clemenceau.

Soldiers Break Ranks and Join in the Demonstrations of Joy—Chinese

*पहिले महायुध्द संपल्याबद्दल तत्कालीन वर्तमानपत्रात आलेली बातमी (स्रोत – विकीपिडिया)*

औद्योगिक क्रांती युरोपात होऊनही अमेरिका ही बलाढ्य औद्योगिक महासत्ता कशी बनली? अमेरिका हा मुळात युरोपियन लोकांच्याच वसाहतींचा समूह होता. या वसाहतींमध्ये स्थायिक झालेल्या मूळच्या युरोपियन नागरिकांनी परस्परांशी हातमिळवणी केली व युद्ध

करून आपल्या मातृदेशांपासून स्वातंत्र्य मिळवले. पण हे स्वातंत्र्य युरोपीय गोऱ्या लोकांपुरतेच मर्यादित राहिले, तिथल्या मूलनिवासी लोकांना कधीच मिळाले नाही. थोडक्यात म्हणजे अमेरिकेची युरोपशी असलेली नाळ कधीच तुटली नाही. त्यामुळेच युरोपीय महासत्तांशी लढून स्वतंत्र झाल्यावरही त्याच महासत्तांशी मित्रत्वाचे नाते स्थापन करायलाही त्यांना फार वेळ लागला नाही. मात्र या नव्या भूमीत औद्योगिकीकरणावर आधारित शासनव्यवस्था, अर्थव्यवस्था यांची घडी कोणत्याही पूर्वपरंपरांचे जोखड न बाळगता या मूळच्या युरोपियनांना घालता आली. युरोपातून कधी सनदशीर तर कधी छुप्या मार्गांनी नवनवीन तंत्रे अमेरिकेत येत गेली आणि युरोपीय महासत्ता एकमेकींशी झगडण्यात गुंतलेल्या असताना अमेरिका मात्र तांत्रिकदृष्ट्या प्रगत व धनाढ्य राष्ट्र बनले.

१९१८ साली पहिले महायुद्ध संपले असले, तरी युरोपात जे दोन तट पडले होते त्यांचे वैर संपले नाही. जेत्या गटाने हरलेल्या गटावर अत्यंत मानहानीकारक अटी लादल्या. यातून त्या देशांच्या अर्थव्यवस्था कोसळल्या. या देशांतील नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषामुळेच तिथे पुढे फासिस्ट विचारसरणीला बळ मिळाले. जर्मनीत हिटलरच्या नेतृत्वाखाली इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ सिद्ध करण्याच्या धडपडीचा एक भयानक अविष्कार जगाने पाहिला. आर्यपणाच्या दुराभिमानाच्या आगीने ६० लाख ज्यूंचा बळी घेतला.

दुसरे महायुद्ध हे एका अर्थाने पहिल्या महायुद्धाचाच विश्रांतीनंतरचा दुसरा अंक होता. अनेक ठिकाणी भडका उडण्यासारखे संघर्ष सुरूच होते. जर्मनीने पोलंडवर हल्ला केल्यामुळे पोलंडच्या सीमांच्या संरक्षणाची हमी दिलेल्या इंग्लंड व फ्रान्सला जर्मनीविरुध्द युद्धाची आघाडी उघडणे भाग पडले व अधिकृतरित्या दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले.

१९व्या शतकात जपान हा आशियातील छोटा देशही झपाट्याने औद्योगिक बनला होता. पण जपानकडे स्वतःचा कच्चा माल कमी असल्याने जपाननेही आजूबाजूच्या इतर देशांवर नियंत्रण मिळवून आपले साम्राज्य निर्माण करण्याचा मार्ग अवलंबला. पण जपानच्या आवाक्यातले भूप्रदेश हे आधीच कोणत्या ना कोणत्या युरोपीय महासत्तेच्या वसाहती होत्या. त्यामुळे जपान व युरोपीय देश यांच्यात संघर्ष सुरू झालेलाच होता. जपान, जर्मनी आणि इतर काही युरोपीय राष्ट्रांनी परस्पर सहकार्याचा करार केला असला, तरी इंग्लंड, फ्रान्स, रशिया व त्यांच्या मित्रराष्ट्रांनी जपानच्या महत्त्वाकांक्षेला वेसण घालण्याचा प्रयत्न चालूच ठेवला होता. महायुद्धाला सुरूवात झाल्यावर जपाननेही जर्मनीच्या बाजूने युद्धात उडी घेतली.

याही महायुद्धात मुख्यतः युरोपियनांच्या संघर्षात युरोपीय महासत्तांच्या वसाहतीही ओढल्या गेल्या. याही महायुद्धात सुरूवातीला अमेरिका अलिप्त राहिलेली होती. पण जपानने पर्ल हार्बर या अमेरिकी लष्करी तळावर हल्ला केला व अमेरिकेला युद्धात सहभागी होणे भाग पडले. याही महायुद्धात तांत्रिकदृष्ट्या प्रबळ अमेरिका ज्या बाजूला त्या बाजूचे पारडे जड झाले आणि इंग्लड व दोस्त राष्ट्रांचा विजय झाला.




*पर्ल हार्बर युध्द स्मारक*
*(स्रोत - विकीपिडिया)*

दुसऱ्या महायुध्दात एकीकडे जर्मनीद्वारे माणसे किती पराकोटीची क्रूर बनून, किती मोठा नरसंहार करू शकतात, याचे उदाहरण जगापुढे आले. दुसरीकडे युद्धाची सांगता

करताना अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबाँब टाकून विध्वसांचे एक अभूतपूर्व विदारक रूप जगाला दाखवले.

१९४५ नंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना होऊन जागतिक शांततेचे पर्व सुरू करण्याचा एकीकडे प्रयत्न होत असला, तरीही त्याच्या जोडीला शासन व समाज यांचे नाते कसे असावे याबाबतच्या दोन टोकाच्या भूमिकांमधला - भांडवलशाही व साम्यवाद यांमधला - छुपा संघर्ष सुरू झाला. या संघर्षाचा एक परिणाम म्हणजे यातून जगातील औद्योगिक राष्ट्रांचे दोन




*संयुक्त राष्ट्रसंघाचे संस्थापक देश (स्रोत- विकीपिडिया)*

नवे गट तयार झाले. भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या गटाचे नेतृत्व अमेरिकेकडे होते, तर साम्यवादी अर्थव्यवस्था असलेल्या देशांचे नेतृत्व रशियाकडे होते. एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी दोन्ही गटांनी युद्धापेक्षा इतर वेगळे मार्ग शोधले.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यानंतर बहुदा थेट एकमेकांशी युद्ध करण्यातला धोका सर्वांच्याच लक्षात आला होता. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अण्वस्त्रे. भांडवलशाही व साम्यवादी या दोन्ही गटांकडे मिळून सर्व जगाचा अनेकदा विध्वंस करता येईल इतकी अण्वस्त्रे होती आणि त्यामुळे व्यापक युद्धखोरीला बव्हंशी आळा बसला. पण एकमेकांच्या प्रभावाखालील देशांच्या राजकारणात हस्तक्षेप, तंत्रज्ञानाची नवीन शिखरे गाठण्याची

चढाओढ - उदा. चंद्रावर माणूस पाठवणे इ. प्रकारांनी दोन्ही गट १९४५ पासून एकमेकांवर मात करण्याचे प्रयत्न दीर्घकाळ करत राहिले. १९५० पासून ते साधारण १९९० पर्यंतचा हा कालखंड शीतयुद्ध म्हणून ओळखला जातो.

दुसऱ्या महायुद्धाच्या आर्थिक बोजामुळे युरोपीय साम्राज्ये खिळखिळी झाली होती. त्यामुळे दुसरे महायुद्ध संपल्यावर वसाहतींना स्वातंत्र्य देऊन आपल्या अंतर्गत अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करणे त्यांना भाग पडले. या नव्याने निर्माण होणाऱ्या देशांना आपल्याकडे ओढण्यासाठीही अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाही व रशियाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी या दोन्ही गटांकडून साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा वापर केला गेला. या दोघांपासून अलिप्त राहूनही दोन्ही गटांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याची तारेवरची कसरत भारतासह इतर अनेक देशांनी केली. या साऱ्या घडामोडींचा आढावा घेऊ या पुढच्या लेखात.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी - बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: औद्योगिक क्रांती, पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, भांडवलशाही, साम्यवाद, अमेरिका, जर्मनी, रशिया, जपान)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. २०१८ सालापासून 'शैक्षणिक संदर्भ' हा इ-अंक इ-मेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील. आपला व्हॉट्सॅप क्रमांक कळवल्यास आपल्याला Sandarbh Readers या आमच्यावाचक गटामध्ये सामील केले जाईल. तेथेही आपण लेख व अंक वाचू शकाल.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.*

*या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा.. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

इ-पेमेंट : Sandarbh Society

Account No.: 20047006634

Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune

IFS Code: MAHB0000852

- ***संपादक मंडळ,शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***